


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३२ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । गुरूवार २४ /०९/२०२६ । पाने - ६




# संगमनेरात संशयित 'काऊ घी'चा साठा जप्त

## FDAची धडक कारवाई २ लाख ६० हजार रुपयांचा साठा ताब्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांमधील भेसळ व निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. संगमनेर तालुक्यातील मे. व्ही. एस. एकदंत फुड प्रॉडक्ट्स या आस्थापनेवर अन्न सुरक्षा विभागाच्या पथकाने अचानक तपासणी करून कमी दर्जाचा संशय असलेला 'काऊ घी'चा तब्बल २ लाख ६० हजार ८२० रुपये किमतीचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाने अधिक कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

सहायक आयुक्त (अन्न) सो. ह. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. सूर्यवंशी यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे २१ सप्टेंबर २०२६ रोजी मे. व्ही. एस. एकदंत फुड प्रॉडक्ट्स, ता. संगमनेर येथे अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत आवश्यक अनुपालन होत नसल्याचे तसेच संबंधित अन्नपदार्थाच्या दर्जाबाबत संशय निर्माण झाल्याचे आढळून आले.

त्यानंतर पथकाने 'काऊ घी (जार)' आणि 'काऊ घी (१५ किलो टिन)' या उत्पादनांचे नमुने घेतले आणि संबंधित साठा जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये १ लिटरचे १७६ जार म्हणजे १७६ लिटर काऊ घी, ज्याची किंमत १ लाख ३५ हजार ५२० रुपये, तर १५ किलोचे १२ टिन म्हणजे १७९ किलो काऊ घी, ज्याची किंमत १ लाख २५ हजार ३०० रुपये, असा एकूण २ लाख ६० हजार ८२० रुपयांचा साठा आहे.

जप्त केलेल्या अन्नसाठ्यातून घेण्यात आलेले नमुने तपासणी व विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. या नमुन्यांचे अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार नियमानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. सूर्यवंशी हे सहायक आयुक्त (अन्न) सो. ह. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

दरम्यान, आष्टी (जि. बीड) येथील दूध भेसळ प्रकरणात सहभाग आढळून आल्याने मे. भगवान कृपा दूध संकलन व शीतकरण केंद्र, मु. पो. खर्डा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर या आस्थापनेचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. या आस्थापनेचे मालक हरिदास एकनाथ गोपाळघरे असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

सणासुदीच्या काळात मिठाई, दुग्धजन्य पदार्थ आणि अन्य खाद्यपदार्थांची मागणी वाढत असल्याने अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. जिल्ह्यातील स्वीटमार्ट तसेच खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी कमी दर्जाचे अथवा अस्वच्छ ठिकाणी तयार केलेले अन्नपदार्थ तयार करणे, साठवणे किंवा विक्री करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच बाहेरील राज्यांतून कमी दर्जाचे अन्नपदार्थ ट्रॅव्हल्स अथवा अन्य वाहनांमधून अस्वच्छ पद्धतीने जिल्ह्यात आणू नयेत. अशा प्रकारची वाहतूक आढळल्यास संबंधित ट्रॅव्हल्स एजन्सीविरुद्धही नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

अन्नपदार्थांच्या भेसळीबाबत संशय अथवा तक्रार असल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त (अन्न), परिमंडळ-२, सो. ह. इंगळे यांनी केले आहे.

# सण-उत्सवात रस्त्यांवर फटाकेबंदी, डीजे-डॉल्बी. लेझर बीमसवरही लगाम

## ध्वनी-वायुप्रदूषण रोखण्यासाठी उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

मुंबई (वृत्तसंस्था)

ध्वनी आणि वायुप्रदूषण न करताही सण-उत्सव आनंदाने साजरे करता येतात, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईसह संपूर्ण राज्यात सण-उत्सवांच्या काळात रस्त्यांवर फटाके फोडण्यास संपूर्ण बंदी घालण्याचे तोंडी आदेश राज्य सरकारला दिले. तसेच धार्मिक मिरवणुकांमध्ये कर्णकर्कश डीजे, डॉल्बी, ध्वनिवर्धक आणि लेझर बीम्सचा वापर अनावश्यक असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. सण-उत्सवांच्या काळात सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडणे, ध्वनिवर्धकांचा मोठ्या आवाजात वापर करणे आणि डीजे-डॉल्बीमुळे निर्माण होणाऱ्या ध्वनी व वायुप्रदूषणाची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. 'मुंबईसारख्या शहरात रस्त्यावर फटाके फोडण्याची परवानगीच का असावी?' असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. सणासुदीच्या काळात फटाक्यांमुळे मुंबईत वायुप्रदूषण वाढते आणि धुरके निर्माण होते. त्यामुळे दिवस असो वा रात्र, रस्त्यांवर फटाके फोडता येणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मुंबईतील डीजे आणि डॉल्बीच्या वापरावर राज्य सरकार किंवा संबंधित यंत्रणांचा पुरेसा अंकुश नसल्याबद्दलही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. डीजे आणि डॉल्बीसाठी वापरल्या जाणाऱ्या डिझेल जनरेटरमुळेही प्रदूषणात भर पडत असल्याचे न्यायालयाने सरकारच्या निदर्शनास आणून दिले.

नागपूरचे पोलिस आयुक्त डीजे आणि डॉल्बीवर बंदी घालण्यासाठी कारवाई करू शकतात, तर मुंबईचे पोलिस आयुक्त तसे का करू शकत नाहीत, असा सवाल करत दोन्ही शहरांच्या पोलिस यंत्रणांमध्ये समन्वय असण्याची गरज न्यायालयाने व्यक्त केली. गणेशोत्सवासह विविध सणांमध्ये कर्णकर्कश आवाजात डीजे, डॉल्बी, लाऊडस्पीकर वाजवणे किंवा मोठ्या प्रमाणात फटाके फोडणे यामुळे देव आपल्याला अतिरिक्त आशीर्वाद देणार आहेत का, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. जबाबदार समाज म्हणून अशा प्रकारांना आळा घालण्याची गरज आहे, असेही न्यायालयाने नमूद केले. सण-उत्सव आनंद आणि मनःशांतीसाठी साजरे केले जातात; मात्र फटाके, मोठा आवाज आणि मिरवणुकांमुळे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच इतर नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. रस्त्यांवर बेफिकीरपणे फटाके फोडल्याने अपघातांचाही धोका निर्माण होतो, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

# सामान्य नागरिकांच्या प्रश्नांची जाण आणि सोडवणूक हाच राजकारणाचा पाया हवा - मा. मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजकारण हे केवळ सत्ता मिळविण्याचे साधन न राहता समाजकारणाचे प्रभावी माध्यम बनले पाहिजे. गावातील सर्वसामान्य माणूस, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि युवकांच्या दैनंदिन प्रश्नांची जाण ठेवून ते प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम करणे हाच खऱ्या अर्थाने राजकारणाचा पाया असायला हवा असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी महसूलमंत्री, बाळासाहेब थोरात यांनी केले.

दैनिक युवावार्ताच्या कार्यालयात श्री गणरायाच्या आरतीप्रसंगी बाळासाहेब थोरात यांच्यासह नगरसेवक गजेंद्र अभंग, डॉ. निलेश सातपुते, उपस्थित होते. माजी मंत्री थोरातांनी श्री गणेशाची आरती करून सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. दैनिक युवावार्ताच्या परिवाराशी संवाद साधताना त्यांनी संगमनेर तालुक्यातील विविध प्रश्नांसह सध्याच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवरही भाष्य केले. आज राजकारणाची दिशा आणि त्यातून निर्माण होणारे वातावरण चिंतेचा विषय असल्याचे सांगत थोरात म्हणाले की, राजकीय मतभेद असू शकतात; मात्र सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न त्यापेक्षा मोठे आहेत. (पान २ वर)

# संगमनेरला १०२ कोटींच्या विविध विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील विविध विकासकामांना चालना देण्यासाठी सुमारे १०२ कोटी रुपयांच्या विकास कामांचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी जलसंपदमंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. अमोल खताळ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन व लोकार्पण सोहळा होणार आहे.





संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव येथे सुमारे ४ कोटी ४७ लाख रुपये खर्चाच्या उपसा जलसिंचन योजना कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या योजनेमुळे परिसरातील शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.तसेच समनापूर येथील गणपती मंदिर परिसरामध्ये सुमारे ९७ कोटी २५ लाख रुपये खर्चाच्या संगमनेर ते वडगाव पान फाटा, निळवंडे ते कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग (जांभूळवाडी फाटा) या मार्गावरील रस्ते सुधारणा कामाचा शुभारंभकरण्यात येणार आहे. तसेच संगमनेर नगरपरिषद हद्दीतील साई नगर येथील म्हाळुंगी नदी पुलाला स्व. खासदार बाळासाहेब विखे साईसेतू या नामफलकाचे अनावरण करण्यात येणार आहे.तसेच गंगामाई घाटावर सुमारे४०लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या हिंदू दशक्रियाविधी घाटाचे लोकार्पणही करण्यात येणार आहे.

तसेच श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर येथील सुमारे३० लाख रुपये खर्चाच्या सभामंडपाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यास महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.












# अकोले तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा : आ. लहामटे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अकोले विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांसाठी आ. डॉ. किरण लहामटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करून दुष्काळग्रस्त यादीत अहिल्यानगर जिल्ह्यासह अकोले तालुक्याचा समावेश करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

आ. डॉ. लहामटे यांनी अकोले मतदारसंघातील शेतकरी, विद्यार्थी, आदिवासी बांधव तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध महत्त्वाच्या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करून मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. महाराष्ट्रात सध्या दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून पिकांची प्रत्यक्ष स्थिती गंभीर आहे. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पिकांच्या गरजेच्या कालावधीत पावसाचा मोठा खंड पडल्याने पिकांवर त्याचा परिणाम झाला आहे. त्यामुळे दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी केली आहे. शेती व गावठाण फिडरवरील वीजपुरवठ्याचा प्रश्न अनेक महिन्यांपासून गंभीर बनला आहे. सध्या सुरू असलेला आठ तासांचा वीजपुरवठाही सुरळीत होत नसून वारंवार वीज खंडित होत आहे. धरणांमध्ये पाणीसाठा उपलब्ध असतानाही वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरूव असल्याने त्यांची अभ्यासाची वेळ लक्षात घेता सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत वीजपुरवठा खंडित होऊ नये अशी मागणीही त्यांनी केली.

कल्याण-लातुर महामार्ग अकोले मतदारसंघातील काही गावांतून जात असून येथे अल्पभूधारक व बागायतदार शेतकरी असल्याने त्यांच्यात असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे. तरी शेतकऱ्यांशी संवाद साधून निर्णय घेण्यात यावा. अकोले तालुक्यात पेसा भरतीचा प्रश्न गंभीर असून या मागणीसाठी अनेक दिवसांपासून उपोषण सुरू आहे. त्यामुळे पेसा भरतीचा प्रश्न तातडीने मार्गी लावून पात्र उमेदवारांना न्याय द्यावा, अशी मागणीही मुख्यमंत्र्यांकडे केली.

# संगमनेरात २८ सप्टेंबरला बालकुमार साहित्य संमेलन

## शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची नांदी - सौ. दुर्गाताई तांबे

युवावार्ता ( प्रतिनिधी )

मातृभाषेविषयी निष्ठा वृद्धिंगत करणे, वाचन संस्कृतीला चालना देणे, मराठी भाषेचा प्रचार - प्रसार करणे तसेच विद्यार्थी व पालकांमध्ये साहित्याविषयी सजगता निर्माण करण्याच्या उद्देशाने संगमनेर येथे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्वागताध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे यांनी दिली.





लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयात पत्रकार परिषदेत माहिती देताना त्या म्हणाल्या की, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेर, समर्थ युवा फाउंडेशन आणि मराठी भाषा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन होत आहे. सोमवार दिनांक २८ सप्टेंबर रोजी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रसिद्ध वक्ते व साहित्यिक डॉ. संजय कळमकर, तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ.स्वाती महाळंक उपस्थित राहणार आहेत. राज्याचे माजी शिक्षण व महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, संमेलनास महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह प्रसाद मिरासदार, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा संगमनेरचे कार्यवाह डॉ. नितीन संगमनेरकर, शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

संमेलनात विविध ज्ञान, रंजन आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्ष डॉ. संजय कळमकर यांचे प्रभावी व्याख्यान होणार आहे. तसेच श्रीमती संगीता पुंडगे यांचा मनोरंजनात्मक 'बोलक्या बाहुल्या' हा कार्यक्रम, प्रसिद्ध गायक त्यागराज खाडीलकर व दीपिका जोग यांचा 'अक्षर गाणी' हा प्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे. शालेय पाठ्यपुस्तकातील संगीतमय कवितांचे गायन प्रकाश पारखे व विद्यार्थी सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन संदीप वाकचौरे करणार असून ध्वनी संयोजनाची जबाबदारी संतोष गोटस्कर यांच्यावर आहे.

संमेलनात राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली आहे. तसेच ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक व लेखक योगेश सोमण यांचा 'ज्योती' हा लघुपट आणि मराठी भाषा संचालनालयाचा माहितीपट दाखविण्यात येणार आहे. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेर ही संस्था २०१० पासून साहित्य, संस्कार, संस्कृती, ज्ञान आणि कला विषयक विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेचे संस्थापक डॉ. संजय मालपाणी यांचे या उपक्रमांना सहकार्य लाभत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेरचे अध्यक्ष अनिल देशपांडे यांच्या पाठपुराव्यामुळे संगमनेरला या बालकुमार साहित्य संमेलनाचा बहुमान मिळाला आहे. आगामी २०२७ मध्ये पुणे येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे १०० वे साहित्य संमेलन होणार असून, त्यानंतरचे १०१ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन २०२८ मध्ये संगमनेर येथे व्हावे, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे दुर्गाताई तांबे यांनी सांगितले. या साहित्य संमेलनात संगमनेर शहरासह ग्रामीण भागातील विविध शाळांचे प्रतिनिधी, सर्व पत्रकार बांधव सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि मराठी भाषेबद्दल आत्मीयता वाढविणे हा संमेलनाचा प्रमुख उद्देश आहे.

संमेलन यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अनिल देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. विवेक वाकचौरे, कार्याध्यक्ष अरविंद गाडेकर, सचिव दर्शन जोशी, कोषाध्यक्ष अरुण तिळे, सहसचिव चारुदत्त काटकर तसेच सदस्य शशांक गंधे, प्रकाश पारखे, अनिल सोमणी आणि ओंकार बिहाणी प्रयत्नशील आहेत. तरी या एकदिवसीय साहित्य संमेलनात संगमनेर शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालकुमार साहित्य संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे यांनी केले आहे.

# मानहानी खटल्यात ठाकरे-शिंदे निर्दोष

मुंबई (वृत्तसंस्था)

दिवंगत नेते वसंत डावखरे मानहानी खटल्याचा अंतिम निकाल समोर आला आहे. यात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. १७ वर्षांनंतर वसंत डावखरे प्रकरणी हा निकाल लागलेला असून यात ठाकरे शिंदे यांच्यासह पाच जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

या संदर्भातील अधिकची माहिती अशी की, २००९ मध्ये कथित सीडी प्रकरण होते, ही सीडी लॅबमध्ये देखील पाठवण्यात आली होती. त्यावेळी न्यायालयाने ३१३ प्रमाणे उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे यांच्यासह इतरांचे साक्ष नोंदवले होते. मात्र जे साक्ष होते, त्यांची साक्ष या सगळ्याबाबतीत आरोप प्रत्यारोप देखील करण्यात आले होते. आज कल्याण सत्र न्यायालयाचे न्यायाधीश प्रथम वर्ग संतोष आगे यांच्या दालनात आज या संदर्भात अंतिम निकाल लागला असून ठाकरे आणि शिंदे यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रदीर्घ खटल्यादरम्यान २० हून अधिक साक्षीदारांच्या साक्षी तसेच उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जबाब नोंदवण्यात आले.


**CHANGE IN NAME**

**I HAVE CHANGED MY OLD NAME**
DIVAKAR TUKARAM GADEKAR

**TO NEW NAME**
DIWAKAR TUKARAM GADEKAR

AFFIDAVIT NO.
2652242021268101330928
Mob - 9960113364

ADD- AT. AMBIKHALSA, POST. GHARGOON, TAL- SANGAMNER, DIST- A. NAGAR, PIN- 422605


# दैनिक युवावार्ता कार्यालयात मान्यवरांकडून गणेशाची आरती



दैनिक युवावार्ता कार्यालयामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरती भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मंगळवारी सायंकाळी प्रसिद्ध उद्योजक राजपाल क्लॉथचे संचालक सोनुशेठ राजपाल, लालतारा मेडिकलचे संचालक सचिन आवारी, करवा होलसेल मेडिकलचे संचालक मधुसूदन करवा यांच्या हस्ते युवावार्ता कार्यालयात करण्यात आली. वरील तीनही मान्यवरांनी कोणताही व्यवसाय करायचा असेल तर धोका पत्करण्याची तयारी ठेवली पाहिजे. बाजारपेठेचा व बदलत्या काळानुसार आपल्या व्यवसायात बदल केल्यास नक्कीच यश मिळते. समविचारी व्यावसायिक एकत्र आल्यास मोठा व्यवसाय देखील सहज सुरू आणि यशस्वी करता येतो. फक्त त्यासाठी एकमेकांवरील विश्वास आणि धोका पत्करण्याची तयारी ठेवली तर निश्चित प्रगती अशा भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी युवावार्ताचे संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# पान १ वरून - सामान्य नागरिकांच्या प्रश्नांची जाण आणि ...

राजकारण करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याची भूमिका आवश्यक आहे. नेत्यांनी केवळ व्यासपीठावरून भाषणे न करता शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्याची परिस्थिती समजून घेतली पाहिजे. शेतकऱ्याच्या पिकाला पाणी मिळते की नाही, शेतीसाठी पुरेशी वीज उपलब्ध होते की नाही, उत्पादनाला योग्य भाव मिळतो का, कुटुंबाचे शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या गरजा पूर्ण होतात की नाही याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे.

संगमनेर तालुका हा मोठ्या प्रमाणावर शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. त्यामुळे पाणी हा येथील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. पावसाचे बदलते स्वरूप, काही भागांमध्ये निर्माण होणारी पाणीटंचाई, भूजल पातळीवरील ताण आणि सिंचनाच्या मर्यादा यामुळे शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, सिंचन व्यवस्थेचे बळकटीकरण आणि प्रत्येक भागाला न्याय पद्धतीने पाणी मिळण्यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक असल्याचा मुद्दा यावेळी त्यांनी व्यक्त केला.

शेतीसाठी विजेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. कृषीपंपांना आवश्यक वेळी आणि पुरेशा दाबाने वीज मिळणे, वारंवार होणारे तांत्रिक बिघाड दूर करणे, ग्रामीण भागातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करणे यासाठी प्रशासन आणि विद्युत मंडळाने सातत्याने पाठपुरावा करण्याची गरज आहे. पाणी आणि वीज या दोन मूलभूत बाबींचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादनावर आणि पर्यायाने शेतकरी कुटुंबाच्या अर्थकारणावर होत असल्याने या प्रश्नांकडे प्राधान्याने पाहिले पाहिजे अशी भूमिका व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्याला केवळ संकटाच्या काळात मदत करण्यापेक्षा त्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी व्यवस्था निर्माण होणेही आवश्यक आहे. शेतीमालाला बाजारपेठ, उत्पादन खर्चाचा विचार, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रक्रिया उद्योगांना चालना आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्यास शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळू शकते. गावातील तरुणांना रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये यासाठी स्थानिक उद्योग, कृषीपूरक व्यवसाय आणि कौशल्याधारित रोजगारनिर्मितीला चालना मिळणे आवश्यक असल्याचे मतही यावेळी व्यक्त केले.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दैनिक युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे यांच्या साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील वाटचालीचे विशेष कौतुक केले. राजापूरसारख्या ग्रामीण भागातील अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे येत किसन भाऊ हासे यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर साहित्य आणि पत्रकारिता क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली असल्याचे त्यांनी सांगितले.

किसन भाऊ हासे यांनी काळाच्या पुढे जाऊन राबविलेल्या विविध उपक्रमांचाही थोरात यांनी आवर्जून उल्लेख केला. टेलिफोन डिरेक्टरीच्या माध्यमातून त्या काळात नागरिकांना उपयुक्त माहिती एका ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम असो, अनेक दशकांची परंपरा लाभलेला दिवाळी अंक असो किंवा 'संपादक डायरी'सारखा अभिनव प्रयोग असो या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेला केवळ बातम्यांपुरते मर्यादित न ठेवता समाजाशी जोडण्याचे काम केले असल्याचे थोरात म्हणाले.

पत्रकार आणि संपादकांच्या विविध प्रश्नांसाठी किसन भाऊ हासे यांनी राज्यपातळीवर केलेल्या कामाचाही त्यांनी उल्लेख केला. संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र, मुंबई या संघटनेच्या माध्यमातून राज्यातील संपादक आणि पत्रकारांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शासनाच्या विविध निर्णयांमध्ये आणि शासन निर्णयांमध्ये संघटनेचा उल्लेख होतो तेव्हा या संघटनेच्या माध्यमातून होत असलेल्या कामाची व्याप्ती लक्षात येते असे सांगत थोरात यांनी किसन भाऊंच्या संघटनात्मक कार्याचे कौतुक केले. दैनिक युवावार्तानेे अनेक वर्षे संगमनेर आणि परिसरातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मांडण्याचे काम केले आहे. ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी-कष्टकऱ्यांच्या अडचणी, सामाजिक उपक्रम, शिक्षण, उद्योग आणि स्थानिक विकासाच्या विषयांना सातत्याने व्यासपीठ देण्याची भूमिका पत्रकारितेसाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. पत्रकारितेच्या क्षेत्रातून सुरू झालेली ही वाटचाल आता उद्योग क्षेत्रातही विस्तारत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. युवावार्ता आणि युवा पॉलिप्रिंटच्या माध्यमातून 'युवा उद्योग समूह' प्रगतीची मोठी झेप घेत आहे, याचे मला समाधान आहे असे सांगत त्यांनी या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गणरायाच्या आरतीच्या निमित्ताने झालेल्या या भेटीत पत्रकारिता, समाजकारण, शेती, पाणी, वीज, ग्रामीण विकास आणि उद्योग अशा विविध विषयांवर संवाद झाला.


**DHARATEE MULTISTATE NIDHI LIMITED**
**REGD OFF: 3599B Plot No-23 Ff Office No F-21 Top Imperi Sangamner, Ahmednagar, MH, India, 422602**
**CIN: U65990PN2021PLN204117**
**Email: dharateeudyogsamuh@gmail.com |+91 9175111211**

**Public Notice**

**(Pursuant to section 20 read with Section 96 and section101of the Companies Act, 2013)**

**NOTICE** is hereby given that the **5th** Annual General Meeting of the Members of **DHARATEE MULTISTATE NIDHI LIMITED** will be held on **Wednesday, the 30th day of September, 2026 at 11:00 AM** at the registered office of the company situated at 3599B PLOT NO-23 FF OFFICE NO F-21 TOP IMPERI SANGAMNER, AHMEDNAGAR, AHMEDNAGAR, MAHARASHTRA, INDIA, 422602 to transact the following business:

**ORDINARY BUSINESS:**

1. To consider and adopt the Financial Statements and Board Report with annexure for 31/03/2026.
2. To consider retirement by rotation of Director and re-appointment thereof.

**SPECIAL BUSINESS:**

**To consider and if thought fit to pass the following resolutions:**

4. To consider and approve the increase in Authorized share capital of the Company.
5. To consider and approve Directors remuneration.

*A copy of notice along with the explanatory statement is affixed on the notice Board of the Company. The same can be delivered to the member on request and payment of fees. In case of any queries, members may contact registered office of the Company.*

**BY ORDER OF THE BOARD OF DIRECTORS**
**FOR DHARATEE MULTISTATE NIDHI LIMITED**

**SD/-**
**ANNASAHEB RANGNATH THORAT**
**DIRECTOR**
**DIN: 09298751**

PLACE: Sangamner
NOTES:

- A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and the proxy need not be a member of the company.
- Proxies in order to be effective must be lodged with the company at its registered office at least 48 hours before the time appointed for the meeting.



**नोकरीची सुवर्णसंधी**

**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

**संपर्क -** RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# शेतात काम करणाऱ्या विवाहित महिलेचा विनयभंग

## विरोध केल्यानंतर पतीसह कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी

## आरोपीवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : तालुक्यातील वडगावपान शिवारात शेतात काम करणाऱ्या विवाहित महिलेचा विनयभंग करून तिच्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी (दि. २२) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. याप्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून तालुका पोलिसांनी संतोष ज्ञानदेव शिंदे (रा. मनोली, ता. संगमनेर) याच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आपल्या शेतात ऊस तोडणीच्या कामासाठी गेली होती. त्यावेळी ती शेतात एकटीच असताना आरोपी संतोष शिंदे हा अचानक पाठीमागून आला. त्याने महिलेला पाठीमागून मिठी मारून तिच्या इच्छेविरुद्ध लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले तसेच अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने आरोपीला जोरदार विरोध केला. त्यानंतर आरोपीने सदर प्रकार कोणाला सांगितल्यास महिलेसह तिच्या पतीला आणि कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

महिलेने आरोपीच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेत घर गाठले. घडलेला प्रकार तिने आपल्या पतीला सांगितल्यानंतर दोघांनी तालुका पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी संतोष ज्ञानदेव शिंदे याच्याविरुद्ध विनयभंगासह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलीस करीत आहेत.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत सर्वेश म्हस्केची कामगिरी



पुणे येथे ३० ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत संगमनेर तालुक्यातील शिबलापूर येथील सर्वेश नितीन म्हस्के याने आपल्या विलक्षण वेग, अचूकता आणि गणिती कौशल्याची चमक दाखवत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा मानाचा किताब पटकावला. राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे सर्वेशचे सर्वत्र कौतुक होत आहे. या स्पर्धेत सर्वेशने अवघ्या ८ मिनिटांत तब्बल २०० पैकी २०० गणिते अचूकपणे सोडवून प्रथम क्रमांक मिळवला. त्याच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल त्याला 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' ट्रॉफी प्रदान करण्यात आली. अत्यंत कमी वेळेत २०० गणिते अचूकपणे सोडविण्याची त्याची कामगिरी ही त्याची विलक्षण एकाग्रता, गणिती क्षमता आणि सातत्यपूर्ण सरावाची साक्ष ठरली आहे.

सर्वेशच्या या यशामागे त्याच्या कुटुंबीयांचे प्रोत्साहन तसेच गॅलॅक्सी अबॅकस, अहिल्यानगर येथील श्री. अमोल ढेपे सर आणि सौ. सोनाली ढेपे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेशने नियमित सराव, वेळेचे काटेकोर नियोजन आणि गणितातील अचूकतेवर विशेष भर देत स्पर्धेची तयारी केली.

राष्ट्रीय स्तरावरील या उल्लेखनीय यशामुळे सर्वेशने शिबलापूर तसेच संगमनेर तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा ठसा उमटविला आहे. त्याच्या या यशाबद्दल पालक, शिक्षक, मार्गदर्शक, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कठोर परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वेश भविष्यातही यशाची नवनवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अमृतवाहिनी सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, संगमनेरच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी पुणे येथील अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविले. इंजिनिअर्स डे व नॅशनल कॉंक्रीट डे २०२६ निमित्त आयोजित या स्पर्धांमध्ये अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिकांसह एकूण ७ ट्रॉफी आणि ४१ हजार ५०० रुपयांची रोख पारितोषिके मिळवत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर यांनी दिली.

याबाबत माहिती देताना ते म्हणाले कि, लोकनेते बाळासाहेब थोरात, सौ. शरयुताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी महाविद्यालयाने कायम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकडे लक्ष दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुणे येथे आयोजित इंजिनिअर्स डे व नॅशनल कॉंक्रीट डे २०२६ निमित्त आयोजित या स्पर्धांमध्ये अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळवली आहेत.

ग्रीन कॉंक्रीट, मिक्स डिझाईन स्पर्धेत दर्शन मालटकर, मयुरेश नारोटे, जय कडाळे, रितेश राठोड व तन्मय आव्हाळे यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवत ट्रॉफी व १० हजारांचे पारितोषिक पटकावले. कॉंक्रीट क्यूब टेस्टिंग स्पर्धेत सूरज झोडगे, तुषार पवार, साहिल उगलमुगले, सिद्धांत शिंदे व संकेत वाबळे यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत ट्रॉफी व ७ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळविले. सर्व्हेइंग लाइन-आऊट स्पर्धेत दिग्विजय रोहमारे, गौरव साबळे, श्रावणी शिंदे, रिद्धी कोकणे, पूजा शिंदे व राहुल क्षीरसागर यांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवून ट्रॉफी व ५ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक पटकावले. टेक्निकल क्विझमध्ये अथर्व भावसार, विशाखा गांगुर्डे, अनिकेत गीते, वैष्णवी अंकामवार तर क्यूब टेस्टिंगमध्ये मयुरेश नारोटे, अजय वाळुंजे, दर्शन मालटकर व जय कडाळे यांनी तृतीय क्रमांक मिळवत ट्रॉफी व ५ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळविले. आईस्क्रीम स्टिक ब्रिज स्पर्धेत भक्ती जाधव, संस्कृती गोडसे, ईश्वरी डुकरे, सानिका गाडेकर व आर्यन देशमुख यांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवत ट्रॉफी व ५ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळविले. ऑटो कॅड स्पर्धेत दातीर समृद्धी हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवत ट्रॉफी व २ हजारांचे पारितोषिक पटकावले आहे.

# मनोलीच्या मातीतला खरा धर्म... माणुसकी !

## माझ्या मनोली गावातील एकमेव मुस्लिम कुटुंब... भैयाचं कुटुंब!



आजूबाजूला जात-पात आणि धर्माच्या नावावर माणसं एकमेकांपासून दुरावत असताना, आमच्या गावात मात्र माणुसकीचा, प्रेमाचा आणि आपुलकीचा धागा आजही तितकाच घट्ट आहे. कारण आमचं गाव केवळ सण साजरे करत नाही, तर एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन माणुसकी जगतं. आमच्या गावच्या देवीच्या सुवासिनी घालण्यापासून ते गावातील सप्ताहापर्यंत, हिंदू देव-देवतांच्या प्रत्येक सण-उत्सवात भैयाचा सहभाग नेहमीच असतो. भैया दिसला नाही, असा गावचा सण कदाचित कधीच झाला नसेल. कारण त्याच्यासाठी हे केवळ धार्मिक कार्यक्रम नाहीत, तर गावाशी आणि गावकऱ्यांशी जोडलेलं आपलेपण आहे. भैयाचे वडील, शब्बीरभाई आमच्या गावातील प्रत्येक पोराचा हक्काचा चाचा!

जिल्हा परिषद शाळेत शिकत असताना शब्बीरभाई शाळेजवळ नेहमी बसलेले असायचे. पोरांशी गोड बोलायचे, त्यांची विचारपूस करायचे आणि आपल्या खास अननस घातलेल्या गोड सरबताने सगळ्यांना आनंद द्यायचे. त्या सरबतात केवळ चव नव्हती, तर चाचांच्या मायेची गोडी होती.

आज शब्बीरभाई अल्लाहला प्यारे झाले आहेत. पण त्यांचं प्रेम, त्यांची माया आणि गावाशी असलेलं नातं आजही जिवंत आहे. त्यांच्या कुटुंबाच्या सुख-दुःखात संपूर्ण गाव उभं राहतं. आणि भैयादेखील गावातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात तितक्याच आपुलकीने सहभागी होतो. आज गावातील गणपतीच्या आरतीला भैयाचं संपूर्ण कुटुंब आलं. गांधी टोपीऐवजी गोल टोपी घालून त्यांनी गणपतीची आरती केली. पण ना आमच्या गावाला त्याचं काही वेगळं वाटलं, ना गावच्या पोरांना आणि पुढेही कधी वाटणार नाही!

कारण आमचं गाव जात-पात आणि धर्माच्या भिंती केव्हाच ओलांडून पुढे आलं आहे. इथे माणसाची ओळख त्याच्या धर्माने नाही, तर त्याच्या माणुसकीने होते. इथे देव वेगळे असतील, प्रार्थनेच्या पद्धती वेगळ्या असतील, पण माणसांमधलं प्रेम एकच आहे. आज आमच्या गावात गणपती बाप्पा गुण्यागोविंदाने नांदतो, त्यामागे केवळ सजावट, आरास किंवा मोठा खर्च नाही. त्यामागे आहे प्रत्येक समाजाला सोबत घेऊन चालण्याची भावना. सण तेव्हाच खऱ्या अर्थाने मोठा होतो, जेव्हा त्यात प्रत्येक घराचा सहभाग असतो, प्रत्येक माणसाला आपलेपणाची जाणीव होते आणि संपूर्ण गाव एक कुटुंब बनून उभं राहतं. सण हे केवळ देवाच्या पूजेचे दिवस नसतात, तर माणसांना जोडण्याचे, नाती घट्ट करण्याचे आणि समाजातील भिंती पाडण्याचे सुंदर निमित्त असतात. आणि आमचं मनोली गाव हे केवळ सांगत नाही ते करून दाखवतं. ते सण साजरे करतं आणि माणुसकी जगतं! आज गणपतीच्या आरतीत भैयाच्या कुटुंबाचा सहभाग पाहून पुन्हा एकदा जाणवलं

धर्म वेगवेगळे असले, तरी माणुसकी एकच असते.देव वेगवेगळे असले, तरी आशीर्वाद एकच असतो.आणि गाव वेगळं नसतं गाव म्हणजे एकमेकांसाठी उभं राहणारं कुटुंब असतं!

–अभिजीत बेंद्रे

# व्यवस्थापन, नेतृत्व, उद्योजकता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे देत 'जेनेसिस २०२६'ची उत्साहात सांगता



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.बी.ए. संस्थेत प्रथम वर्षातील एम.बी.ए. आणि एम.सी.ए. विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'जेनेसिस २०२६' या पाच दिवसीय दीक्षारंभ कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, व्यावसायिक आणि व्यक्तिमत्त्व विकास साधण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी नाशिक येथील तंत्रशिक्षण संचालनालयाचे सहसंचालक डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यवस्थापन शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले तर उद्योजक गिरीश मालपाणी यांनी 'हनुमानजींकडून नेतृत्वाचे धडे - धैर्य, नम्रता आणि समर्पण' या विषयावर विचार मांडले. उद्योजिका दिपाली चांडक यांनी 'उद्योजकता आणि नावीन्यपूर्णतेतील करिअरच्या संधी' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दुसऱ्या दिवशी प्रशांत रुणवाल यांनी 'कीप इट सिम्पल' या विषयावर मार्गदर्शन केले. व्यवस्थापन आणि दैनंदिन जीवनात साधेपणा, स्पष्टता तसेच प्रभावी निर्णयक्षमतेचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. श्रीमती शाल्मली शेट्टी यांनी 'व्यावसायिक शिष्टाचार आणि वर्तन' या विषयावर प्रशिक्षण दिले. प्रभावी संवादकौशल्य आणि व्यावसायिक वर्तनाची गरज त्यांनी अधोरेखित केली.

तिसऱ्या दिवशी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी ऋतुजा गायकवाड व भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी धनंजय दिघे यांच्या सहभागाने 'स्वप्न पाहा, विश्वास ठेवा आणि नियोजन करा' या विषयावर प्रेरणादायी संवादात्मक कार्यक्रम झाला. पूर्वा चोथवे यांनी 'व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विचार आणि वापर' या विषयावर मार्गदर्शन केले. व्यवसायातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, माहितीच्या आधारे निर्णयप्रक्रिया आणि व्यवसायवाढीच्या संधी याबाबत त्यांनी माहिती दिली. चौथ्या दिवशी सनदी लेखापाल सी.ए. महेंद्र जामधाडे यांनी 'ताळेबंदाच्या पलीकडे - आर्थिक ज्ञान व्यवसायाच्या यशाला कसे चालना देते' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर संगमनेर महाविद्यालयातील योग विभागाचे सहायक प्राध्यापक प्रा. विजय राज फापळे यांनी 'आरोग्य हेच खरे धन' या विषयातून योग, शारीरिक स्वास्थ्य आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व स्पष्ट केले.

समारोपाच्या दिवशी शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी 'भगवद्गीतेतील व्यवस्थापनाचे धडे - संभ्रमातून स्पष्टतेकडे' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर नाशिक येथील निलेश सोनवणे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता - जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये घडवून आणणारी क्रांती' या विषयावर मार्गदर्शन केले.या पाच दिवसीय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवस्थापन, नेतृत्व, उद्योजकता, आर्थिक ज्ञान, व्यावसायिक शिष्टाचार, कृत्रिम बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकास या विविध क्षेत्रांची व्यापक ओळख झाली. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली तसेच त्यांच्या भावी व्यावसायिक वाटचालीसाठी आवश्यक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

# बालगंधर्व कलादालनात झळकली आनंद गायकवाड यांची व्यंगचित्रे

## पुणे कार्टून फेस्टिव्हल निमित्त बालगंधर्व कलादालनात प्रदर्शन



संगमनेर : गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पुणे कार्टून फेस्टिवल २०२६ अंतर्गत बालगंधर्व कलादालन पुणे येथे महाराष्ट्रातील नामवंत १०१ व्यंगचित्रकारांचे व्यंगचित्र प्रदर्शन २१ व २२ सप्टेंबर रोजी भरवण्यात आले होते. या प्रदर्शनात संगमनेर येथील पत्रकार व चित्रकार आनंद गायकवाड यांच्या व्यंगचित्रांचा समावेश होता.

व्यावसायिक चित्रकार तसेच दै. पुण्यनगरी वृत्तपत्राचे संगमनेर तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले आनंद गायकवाड यांना यापूर्वी मुलूंड ( मुंबई ) येथील महाराष्ट्र सेवा संघाच्या गिरिमित्र संमेलनातील स्केचिंग स्पर्धेत दोन वेळा तसेच मागील वर्षी पुणे येथे महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय व्यंगचित्र स्पर्धेत खुल्या गटात राज्यस्तरीय प्रथम क्रमांक मिळाला आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्याच्या सांस्कृतिक मंत्रालयाने आयोजित केलेल्या पोस्टर स्पर्धेत देशपातळीवरील सुमारे ३ हजार ५०० पेक्षा अधिक कलाकारांमधून निवडलेल्या ७५ कलाकारांमध्ये आनंद गायकवाड निवड झाली असून यानिमित्त प्रकाशित झालेल्या भव्य कॉफीटेबल बुकमध्ये त्यांच्या चित्राचा समावेश आहे.

बालगंधर्व कलादानातील या प्रदर्शनात राज्यातील चारूहास पंडित, प्रशांत कुलकर्णी, संजय मिस्त्री, विश्वास सूर्यवंशी, योगेंद्र भगत, विवेक प्रभूकेळुसकर, गजानन घोंगडे, उमेश कवळे, शरयू फरकांडे, खलील खान, शि. द. फडणीस, प्रभाकर झळके आदींसह कुंचल्याच्या फटकाऱ्यांचे बादशहा दिवंगत बाळासाहेब ठाकरे आणि वसंत सरवटे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या निवडक व्यंगचित्रे व अर्कचित्रांची मेजवानी रसिकांना अनुभवता आली. व्यंगचित्र निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# संपादकीय...

## आपण मुलांना भविष्य देतोय की फक्त स्पर्धा ?

आजच्या काळात प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने मोठे व्हावे, चांगले शिक्षण घ्यावे, उत्तम करिअर करावे आणि आयुष्यात यशस्वी व्हावे, अशी मनापासून इच्छा असते. ही इच्छा स्वाभाविक आणि योग्यही आहे. मात्र या यशाच्या शर्यतीत आपण मुलांना नेमके काय देत आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आपण मुलांना भविष्याची तयारी करून देतोय की त्यांना आयुष्यभर चालणाऱ्या स्पर्धेत ढकलतोय? हा प्रश्न आज प्रत्येक पालकाने स्वतःला विचारायला हवा. मुलांचा जन्म होताच नकळत स्पर्धा सुरू होते. कोणत्या शाळेत प्रवेश मिळाला, कोणाला किती गुण मिळाले, कोणाचे मूल कोणत्या वर्गात पुढे आहे, कोण किती उपक्रमांत सहभागी होते, कोण किती हुशार आहे-या तुलना अगदी लहान वयातच मुलांच्या मनावर परिणाम करू लागतात. शाळेनंतर शिकवणी, त्यानंतर विविध वर्ग, स्पर्धा परीक्षा, कला, क्रीडा आणि इतर उपक्रम असा मुलांचा दिवस भरून जातो. त्यांच्याकडे खेळण्यासाठी, मित्रांसोबत वेळ घालवण्यासाठी किंवा स्वतःच्या आवडीने काही करण्यासाठी वेळच उरत नाही. अर्थात, स्पर्धा वाईट नाही. स्पर्धेमुळे मेहनत करण्याची प्रेरणा मिळते, स्वतःतील क्षमता ओळखता येते आणि पुढे जाण्याची जिद्द निर्माण होते. प्रश्न स्पर्धेचा नाही; प्रश्न आहे स्पर्धेचे प्रमाण आणि तिच्यामागची मानसिकता. प्रत्येक मुलाने पहिलाच यायला हवे, सर्वाधिक गुण मिळवले पाहिजेत आणि इतरांपेक्षा पुढे गेले पाहिजे, असा दबाव निर्माण झाला तर शिक्षणाचा आनंदच हरवतो. आज अनेक मुलांच्या आयुष्यात 'गुण' हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मापदंड बनला आहे. परीक्षेत चांगले गुण मिळाले तर कौतुक आणि कमी गुण मिळाले तर नाराजी. पण मुलाच्या कल्पनाशक्तीचे काय? त्याच्या संवेदनशीलतेचे काय? त्याच्या क्रीडा कौशल्याचे, कलागुणांचे, प्रश्न विचारण्याच्या क्षमतेचे काय? प्रत्येक मूल एकसारखे नसते. कुणी गणितात हुशार असते, कुणी भाषेत, कुणी कलेत, कुणी खेळात, तर कुणी माणसे समजून घेण्यात. मुलांची तुलना करण्याऐवजी त्यांची वैशिष्ट्ये ओळखणे ही पालकांची खरी जबाबदारी आहे. पालकांनी आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा मुलांवर लादण्याचा मोह टाळला पाहिजे. एखाद्या पालकाला डॉक्टर व्हायचे होते म्हणून मुलाने डॉक्टरच झाले पाहिजे, किंवा शेजारचे मूल अभियांत्रिकी करत आहे म्हणून आपल्या मुलानेही त्याच क्षेत्रात जावे, हा दृष्टिकोन योग्य नाही. मुलाचे आयुष्य त्याचे स्वतःचे आहे. पालकांनी त्याला दिशा द्यावी; मात्र त्याच्या स्वप्नांची जागा स्वतःच्या अपेक्षांनी घेऊ नये. आज मानसिक आरोग्याचाही प्रश्न गंभीर बनत आहे. अभ्यास, परीक्षा, गुण, प्रवेश, करिअर आणि सततची तुलना यामुळे मुलांमध्ये तणाव वाढू शकतो. मुलगा किंवा मुलगी एखाद्या परीक्षेत अपयशी ठरली तर ते आयुष्याचे अपयश नाही, हे त्यांना सांगणे आवश्यक आहे. एक परीक्षा, एक गुणपत्रिका किंवा एक प्रवेश परीक्षा एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण भविष्य ठरवत नाही. मुलांना भविष्य देणे म्हणजे केवळ चांगल्या शाळेत प्रवेश देणे किंवा महागडे शिक्षण देणे नव्हे. त्यांना विचार करण्याची क्षमता, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, अपयश स्वीकारण्याची ताकद, समस्यांवर मात करण्याची वृत्ती आणि माणुसकीची जाणीव देणे अधिक महत्त्वाचे आहे. पैशाचे मूल्य समजावून सांगतानाच श्रमाचे महत्त्वही सांगावे. यशाचे स्वप्न दाखवतानाच अपयशातून शिकण्याची तयारीही करून द्यावी. मुलांसोबत संवाद साधणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे. त्यांच्या गुणपत्रिकेपेक्षा त्यांचा दिवस कसा गेला, त्यांना काय आवडते, कोणत्या गोष्टीची भीती वाटते, कोणत्या गोष्टीत आनंद मिळतो, याबद्दल पालकांनी बोलले पाहिजे. मुलाला 'तू किती गुण मिळवलेस?' यापेक्षा 'तुला आज काय नवीन शिकायला मिळाले?' असा प्रश्न विचारला तर शिक्षणाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. शाळांचीही भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पाठांतर आणि परीक्षेतील गुण नव्हेत. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, नेतृत्वगुण, संघभावना, सामाजिक जाणीव आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. क्रीडा, कला, साहित्य, विज्ञान आणि सामाजिक उपक्रमांना अभ्यासाइतकेच महत्त्व मिळाले पाहिजे. पालक, शिक्षक आणि समाज या तिन्ही घटकांनी एक गोष्ट लक्षात ठेवण्याची गरज आहे-प्रत्येक मूल शर्यतीतील धावपटू नाही; काही मुले चित्रकार असतात, काही संशोधक, काही उद्योजक, काही कलाकार, काही संवेदनशील नागरिक. समाजाला फक्त पहिला क्रमांक मिळवणारी मुले नकोत; समाजाला चांगली माणसेही हवी आहेत. आज आपण मुलांना महागडी साधने, उत्तम शिक्षण आणि आधुनिक सुविधा देऊ शकतो.

# कोपरगावात गणेशोत्सवातून शासकीय योजनांचा जागर



युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, लोककल्याणकारी निर्णय आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' या विशेष जनजागृती उपक्रमांतर्गत कोपरगाव येथे शासकीय योजनांचा जागर करण्यात आला. जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर आणि श्रद्धानगरी व जोशीनगर गणेशोत्सव मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात तहसीलदार महेश सावंत यांनी ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. योजनांची पात्रता, उपलब्ध सुविधा आणि लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पात्र नागरिकांनी आपल्या गरजेनुसार योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाची भूमिका स्पष्ट केली. शासकीय योजनांची माहिती जाणून घेण्याबरोबरच पात्र नागरिकांनी त्यांचा लाभ घ्यावा आणि ही माहिती इतरांपर्यंत पोहोचवावी, हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी स्वच्छतादूत व पर्यावरणप्रेमी सुशांत घोडके यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांची सामाजिक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास गणेशोत्सव मंडळाचे मकरंद जोशी, किरण वर्पे, महेंद्र निकम, अक्षय खजुरे, विजय भोकरे, संतोष कुलकर्णी, विकी नरोडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणाचा उपयोग करून शासकीय योजनांची माहिती आणि सामाजिक संदेश थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

# २१ शिक्षकांना 'गंधे सर आदर्श अध्यापन पुरस्कार' प्रदान

## पेटिट विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांनी आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवांना शब्दरूप देत लिहिलेल्या लेखांचे संकलन असलेल्या 'फळा आणि खडू' या पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथील शिक्षक भवनमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात झाले. रफल्स पब्लिकेशनतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकात तब्बल २१ शिक्षकांनी आपले अनुभव मांडले आहेत.

संगमनेर येथील पेटिट विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी 'पेमावि' या नावाने संघ स्थापन केला असून, या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विधायक उपक्रम राबविले जातात. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून 'फळा आणि खडू' या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व नाटककार प्रदीप तुंगारे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, शिक्षकांनी आपल्या अध्यापनातील अनुभवांचे केलेले हे संकलन अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून, अशा प्रकारचे पुस्तक यापूर्वी लिहिले गेले नसल्याचे नमूद केले.

हा कार्यक्रम माजी न्यायमूर्ती सुमंत कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच निवृत्त पोलीस महासंचालक भगवंतराव मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मोरे यांनी आपल्या भाषणात मानवी हक्क आयोगाचे सदस्य असताना बुलढाणा जिल्ह्यातील काही शिक्षकांच्या जटील समस्या सोडविताना घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा अनुभव सांगितला. त्या निर्णयांमुळे शासनाला संबंधित शिक्षकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ द्यावा लागल्याचेही त्यांनी नमूद केले. शिकवण्यासारखे दुसरे पवित्र काम नाही, असे प्रतिपादन न्या. सुमंत कोल्हे यांनी केले. सध्या आपण पुण्यात कायदेविषयक व्याख्याने देत असल्याचेही त्यांनी सांगितले. जुन्या काळातील ना. के. उपासनी, मादुसकर, आर. एस. काकतकर, वि. श्री. मराळकर यांसारख्या शिक्षकांच्या प्रेरणेतून संगमनेरचे लोकप्रिय शिक्षक नारायण गंधे व श्रीकृष्ण गंधे यांनी आदर्श अध्यापनाची परंपरा निर्माण केली. विद्यार्थी हेच दैवत मानून त्यांच्या सेवेला प्राधान्य देणाऱ्या या परंपरेची तिसरी पिढी आज शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्याचे चंद्रमोहन हंगेकर यांनी सांगितले. यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या २१ शिक्षकांना 'गंधे सर आदर्श अध्यापन पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना चंद्रमोहन हंगेकर, किशोर कालडा, ओंकार गंधे, शशांक गंधे, मुकुंद डांगे, डॉ. दाक्षायणी पंडित, जयंत जोर्वेकर, सी. एम. जोशी, रजनी श्रोत्री आणि नितीन साळी या माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### नावात बदल खुलासा

जुने नाव
अभय अर्जुनराव कर्पे
नविन नाव
अभय अर्जु कर्पे
पत्ता-
पिंपळगाव कोंझीरा
पो. वडगावलांडगा, ता. संगमनेर
(अ. नगर)

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक**
मेरी कॉलनी, दिडोरी रोड नाशिक ४२२००४
ई-मेल पत्ता- eeirdrediffmail.com दुरध्वनी क्रमांक. ०२५३-२९९१८८६

**ई- निविदा सुचना क्र. ०४ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे अहिल्यानगर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत, सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | ई-निविदाची किंमत रुपये (जी.एस.टी. व इतर कर वगळुन) | ई-निविदा उपलब्ध कालावधी | ई-निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रवरा उजवा तट कालव्यावरील गंगापुर चर योजनेचे देखभाल दुरूस्ती कामे सन २०२६-२७ | अहिल्यानगर | १२,८७,७७२/- | २३/०९/२०२६ ते ३०/०९/२०२६ | ०९/१०/२०२६ |

जा.क्र. पासंविना/लेखा-२/१०२६/२०२६
पाटबंधोर संशोधन विभाग, नाशिक
दि. १७/०९/२०२६

जिमाका /नगर/जाहि/१२४/२०२६

(श्री.उ.त्रं. मुरकुटे)
कार्यकारी अभियंता
पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक


युवावार्ता
जाहीरात छोटी, प्रतिसाद मोठा

**Jijamata English Medium School**
Pavbaki Road Sangamner, CBSC Affiliation No - 1131530

**VACANCIES**

| PARTICULARS | POST | QUALIFICATIONS |
|---|---|---|
| Pre Primary Teachers | 2 | H. Sc., D. T. Ed |
| PRIMARY AND SECONDARY | | |
| English, Marathi, Hindi | 1 | H. Sc., D. T. Ed / B.A. / M.A., B.Ed |
| Maths, EVS, Science | 1 | B.Sc./M.Sc. (Maths / Science) B.Ed. |
| Social Studies | 1 | B.A. / M.A., B.Ed (History & Geography) |
| IT Teacher | 1 | B.C.S. / M.C.S, B.C.A. / M.C.A. |
| Physical Director | 1 | B.A., B.P. Ed |
| Special Educator | 1 | B.A. / M.A., B.Ed. in Special Education or equivalent qualification |
| School Counsellor | 1 | B.A. / M.A. Clinical Psychology / Diploma/certificate in School Couselling |
| Dance Teacher | 1 | Diploma/ Degree in Fine Arts Performing Art or Related Field |
| Music Teacher | 1 | Sangeet Visharad Proficiency in singing & teaching musical instruments |
| Art and Craft Teacher | 1 | A.T.D.C.T.C (Minimum 2 years teaching experience of CBSE / State Board) |

EXCELLENT ENGLISH COMMUNICATION COMPUTER, AI SKILLS ARE MANDATORY
UNIVERSITY STUDENTS ARE HIGHLY ENCOURAGED TO APPLY!
INTERESTED CANDIDATES CAN CONTACT US
9822304638
shewaletrust@gmail.com
dr.rahulshewale@gmail.com

आकर्षक पगारावर जागा भरणे आहे
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

पाहिजेत
तरूणांसाठी सुवर्णसंधी
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
पुरुष - ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

फ्लॅट विकणे आहे
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड,
पर्पल ब्लुम सोसायटी,
साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर,
1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड,
सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

पाहिजेत
दुकान कामासाठी
होतकरू मुलगा
पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॉर्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क -
सांगळे साहेब - 9850194463 9503947084

पाहिजेत
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

पाहिजेत
रिषभ गोल्ड अँण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)







जागा विकणे आहे
अतिशय उत्तम लोकेशन
तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे
(दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त
०१ बीएचके
रो - हाऊस
भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

जागा विकणे आहे
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

# कामगारांच्या १९ मागण्यांवर सकारात्मक चर्चा

## तातडीच्या मागण्या मंजूर, संगमनेर नगरपालिकेत प्रशासन व कामगार संघटनेची बैठक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहमदनगर जिल्हा नगरपालिका कामगार संघटना, शाखा संगमनेरच्या वतीने नगरपालिकेतील कामगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले होते. या निवेदनातील १९ मागण्यांवर नगरपालिका प्रशासन आणि कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नुकतीच सविस्तर बैठक झाली. बैठकीत तातडीने पूर्ण करणे शक्य असलेल्या मागण्या मंजूर करण्यात आल्या असून, शासनस्तरावरील मागण्यांचा तातडीने पाठपुरावा करण्याचे आश्वासन नगरपालिका प्रशासनाने दिले.

कामगारांचे प्रश्न सातत्याने मार्गी लागावेत यासाठी नगरपालिका प्रशासन आणि कामगार संघटनेची दर तीन महिन्यांनी बैठक घेण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले. त्यामुळे कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर नियमितपणे चर्चा होऊन त्यावर तोडगा काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. चर्चेतील बहुतांश मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याची भावना कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

कामगार संघटनेने सादर केलेल्या निवेदनात प्रामुख्याने वारसाहक्क प्रकरणे विशेष बाब म्हणून निकाली काढणे, सफाई कर्मचाऱ्यांना घरे मोफत उपलब्ध करून देणे, सफाई कर्मचाऱ्यांना मेडिक्लेमची सुविधा लागू करणे, कर्मचाऱ्यांना कर्ज प्रकरणासाठी हमीपत्र उपलब्ध करून देणे, पेन्शन विक्री सुरू करणे, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी गणवेश व साफसफाईसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, सफाई कर्मचाऱ्यांच्या मुला-मुलींना समाजकल्याण विभागामार्फत मिळणारी शिष्यवृत्ती मिळवून देणे, साप्ताहिक सुट्टी लागू करणे, नवीन सफाई कर्मचाऱ्यांची भरती करणे, तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरची आर्थिक देणी एका महिन्यात एकरकमी देणे आदी मागण्यांचा समावेश होता. या बैठकीस संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, आमदार सत्यजित तांबे, नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, किशोर पवार, नितीन अभंग यांच्यासह नगरपालिका प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. अहमदनगर जिल्हा नगर परिषद कामगार संघटना, शाखा संगमनेरच्या वतीने संस्थापक अध्यक्ष ॲड. संग्राम जोंधळे, उपाध्यक्ष राजेश जेधे, माजी नगरसेवक तथा संघटनेचे कार्याध्यक्ष घनशाम जेधे, जगदीश नरवाल, वीरू जेधे, राजेश नरवाल, अजय जेधे, गौतम जेधे, पप्पू तेजी, प्रीतम नरवाल, संदीप कागडे, रवींद्र नरवाल, डॅनियल कदम, बिलाल शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते. कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने आगामी काळात अनेक प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# केंद्राची वाट न पाहता राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी तिजोरी खुली करावी - वडेट्टीवार



मुंबई (वृतसंस्था)

राज्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इतर सर्व कामे बाजूला ठेवून राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःची तिजोरी खुली करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत जमा करावी, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, दुष्काळग्रस्त भागातील लोकप्रतिनिधींनी आपल्या वाढदिवसांचे भव्य सोहळे टाळले पाहिजेत. मुलांचे वाढदिवस दरवर्षी साजरे करता येतात. जर सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या दुःखाची जाणीव नसेल, तर त्यांनी मदतीचा दिखावा करू नये. केंद्र सरकार गुजरातला मोठे आर्थिक पॅकेज देते आणि महाराष्ट्रात मात्र केवळ मते मागण्यासाठी येते. मदत जाहीर करताना महाराष्ट्राच्या पदरात अतिशय तोकडी मदत पाडली जाते.विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांचे अश्रू केवळ मुख्यमंत्र्यांच्या खांद्यावर सुकतील अशी परिस्थिती निर्माण होऊ देऊ नका. सरकारने तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात आणि फळबागांच्या नुकसानीसाठी मोठी मदत जाहीर करावी. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण केले पाहिजेत.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, गेल्या वर्षी २५ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांनी ३१ हजार ६०० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली होती. त्यावेळी २९ जिल्हे बाधित झाले होते. मात्र, वेगवेगळे नियम लावून प्रत्यक्षात केवळ १५ हजार कोटी रुपये (म्हणजेच फक्त ४९ टक्के) देण्यात आले. केवळ आकडा मोठा दाखवून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली; त्या पॅकेजच्या उर्वरित पैशांचे काय झाले? असा सवाल त्यांनी विचारला.


## श्रमिक मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार मर्या; संगमनेर

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

श्रमिक मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार मर्यादित, संगमनेर या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता खालील विषयांचा विचार विनिमय करणे करिता श्रमिक मंगल कार्यालय, संगमनेर येथे आयोजित केली आहे. तरी सभेस सभासदांनी उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१ मा. नियोजित अध्यक्ष यांना अध्यक्षस्थान स्वीकारणेस विनंती करणे.
२. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करून कायम करणे.
३ सन २०२५-२०२६ ची वार्षिक हिशोबाची पत्रके, तेरीज ताळेबंद, नफा तोटा व व्यापारी पत्रकांचा वाचन करून मंजुर करणे
४ संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२६-२०२७ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५ सन २०२५-२०२६ चा लेखापरीक्षण अहवाल वाचन करून नोंद घेणे.
६ सन २०२४-२०२५ चा लेखापरीक्षा अहवालातील दोष दुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
७ सन २०२६-२०२७ कालावधी करिता लेखापरीक्षणासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
८ संचालक मंडळाने सुचवलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
९ मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

**दिनांक: १५/०९/२०२६**
**स्थळ : संगमनेर**

**मा. संचालक मंडळाच्या हुकूमावरून**
**श्री. सोमनाथ अशोक कांडेकर**
**मॅनेजर**
**श्रमिक मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार मर्या; संगमनेर**

टीप : १) सभेपुढील विषयासंबंधी सर्व आर्थिक पत्रके संस्थेच्या कार्यालयामध्ये सभासदांना वाचण्यासाठी खुली ठेवलेली आहेत. २) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ व पोटनिमाप्रमाणे सभेला आवश्यक गणसंख्या नसेल तर त्याच ठिकाणी एक तास थांबून नियोजित सभा पार पडेल.


# बनावट ड्रग्ज कारवाई प्रकरण अंगलट; उपनिरीक्षक सावंत नियंत्रण कक्षात




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील बसस्थानक परिसरातील कथित एमडी ड्रग कारवाईवरून वादाच्या भोवऱ्यात सापडलेले संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांची अखेर नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. त्यांना तातडीने जिल्हा पोलीस मुख्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती आहे.

उपनिरीक्षक सावंत हे गेल्या काही महिन्यांपासून संगमनेर शहर पोलीस ठाण्यात डीबी पथकाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. शहरातील विविध गुन्ह्यांचा तपास तसेच गुन्हे उघडकीस आणण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. मात्र, ३ सप्टेंबर रोजी संगमनेर बसस्थानक परिसरात करण्यात आलेल्या एमडी ड्रग कारवाईनंतर त्यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित झाले होते.

या कारवाईत एका तरुणाकडून ३९ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केल्याचा पोलिसांचा दावा असून, या प्रकरणात कासिफ असद कुरेशी (रा. संगमनेर) याला अटक करण्यात आली होती. मात्र, कारवाईच्या पद्धतीवरून त्याचवेळी पोलिस वर्तुळात तसेच शहरात उलटसुलट चर्चा सुरू झाली होती.

कासिफचे वडील असद रऊफ कुरेशी यांनी या कारवाईवर गंभीर आक्षेप घेत, आपल्या मुलाविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप केला होता. यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह मानवी हक्क आयोगाकडेही तक्रार केल्याचे समोर आले आहे. संबंधित तरुणाकडे अमली पदार्थ नसतानाही कारवाई करण्यात आल्याचा दावा त्यांनी तक्रारीत केला आहे.

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित असल्याचे सांगितले जाणारे काही सीसीटीव्ही फुटेज व छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. त्यामध्ये संबंधित तरुणाच्या वाहनात अमली पदार्थ ठेवले जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचा दावा करण्यात आला. या दृश्यांमुळे प्रकरणाची चर्चा अधिकच वाढली होती. मात्र, या फुटेजची अधिकृत सत्यता आणि त्यातील घटनाक्रमाबाबतचा अंतिम निष्कर्ष तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

या प्रकरणासह शहरातील अन्य काही गुन्ह्यांच्या तपासातील सावंत यांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होत होते. त्यामुळे ड्रग कारवाई प्रकरणाचे गांभीर्य वाढत असतानाच पोलीस प्रशासनाने उपनिरीक्षक सावंत यांची संगमनेर शहर पोलीस ठाण्यातून तातडीने उचलबांगडी केली आहे.

आता या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणार का, चौकशीत नेमके काय निष्पन्न होते आणि त्यानुसार संबंधितांवर पुढील कोणती कारवाई केली जाते, याकडे संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

# सर्वांची कर्जमाफी झाल्याशिवाय थांबणार नाही - मुख्यमंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्यांनी लातूर जिल्ह्यातल्या जाऊ गावात पोहचलेत. आता रब्बीसाठी शक्य ती मदत करू, बळीराजासाठी सर्व काही करू, सगळयांची कर्जमाफी झाल्याशिवाय थांबणार नाही असा निर्धार व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्र्यांसमोर व्यथा मांडताना शेतकऱ्यांना अक्षरशः रडू कोसळले.

फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त जाऊ गावातील पीक परिस्थिती, पाण्याची उपलब्धता याची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी सर्व काही करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रशासनाला पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी आणि महत्त्वाची माहिती दिली आहे. सरकारने दुष्काळ अतिशय गांभीर्याने घेतला असून, येत्या तीन दिवसांत दुष्काळाची पहिली अधिसूचना काढण्यात येईल. शासन या गंभीर काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्पावरून त्यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार निशाणा साधला.

दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, दुष्काळाबाबतचे सर्व अहवाल आम्ही गोळा केले असून त्यानुसार कारवाई सुरू आहे. शेतकऱ्यांना मदत तर करणारच आहोत, पण सोबतच आमची कर्जमाफीची प्रक्रियाही सुरू राहील. ती कुठेही बंद केली जाणार नाही. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त निधीची तजवीज आम्ही करत आहोत, त्यामुळे कुठेही निधीची कमतरता पडू देणार नाही.पत्रकारांनी मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्पाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना फडणवीसांनी विरोधकांवर थेट हल्लाबोल केला. मराठवाडा वॉटर ग्रिड हा अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. मात्र, महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यांनी हा प्रकल्प बंद केला आणि गुंडाळून ठेवला.

# पत्रकार सहदेव जाधव यांना मातृशोक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील साकूर येथील ताराबाई भिकाजी जाधव (वय ७५) यांचे मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने जाधव परिवारावर शोककळा पसरली आहे. मागील काही दिवसांपासून ताराबाई जाधव यांची प्रकृती अस्वस्थ होती. दोन दिवसांपूर्वी त्यांना घोटी येथील एस.एम.बी.टी. रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच मंगळवारी सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

ताराबाई जाधव या पत्रकार सहदेव जाधव, भिमराज जाधव व अर्जुन जाधव यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी साकूर येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. दैनिक युवावार्ताच्या वतीने कै. ताराबाई जाधव यांना भावपूर्ण श्रद्धांजली.







सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल

24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
24 तास सुविधांसाठी 02425 - 224761 मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist


दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०






**१) चिंचोली गुरव, ता. संगमनेर - वेळ : दुपारी ०३ :३० वाजता**
सुमारे ४.४७ कोटी रूपयांच्या उपसा सिंचन योजनेचे भूमिपूजन

**२) गणपती मंदिर,समनापूर ता.संगमनेर- वेळ : सायं. ०५:०० वाजता**
सुमारे १७.२५ कोटी रुपयांच्या संगमनेर - वडगावपान (रामा ५०) ते निळवंडे (रामा ६५) ते कौठे कमळेश्वर - राष्ट्रीय महामार्ग १६० ड (जांभूळवाडी फाटा) रस्ता सुधारणा (भूमिपूजन)

**३) संगमनेर शहर - वेळ : सायं. ०६:०० वाजता**
संगमनेर शहरातील नगरपरिषद हद्दीतील म्हाळुंगी नदीवरील पुलाला स्व. खा. बाळासाहेब विखे पाटील साईसेतू नामफलकाचे अनावरण.

**४) संगमनेर शहर - वेळ : सायं. ०६:१५ वाजता**
संगमनेर, गंगामाई घाट येथील सुमारे ४० लक्ष रुपये किंमतीच्या हिंदू दशक्रिया विधी घाटाचे लोकार्पण

**५) संगमनेर शहर - वेळ : सायं. ०६:३० वाजता**
सुमारे ३० लक्ष रुपये किंमतीच्या श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर येथील सभामंडपाचे लोकार्पण

| शुभहस्ते : | प्रमुख उपस्थिती : |
|---|---|
| मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेब<br>(जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहिल्यानगर) | मा.आमदार श्री. अमोल खताळ पाटील<br>( संगमनेर विधानसभा ) |

**शिवसेना - भाजपा - राष्ट्रवादी - आरपीआय महायुतीचे पदाधिकारी,**
**कार्यकर्ते व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ही नम्र विनंती..!**